रजिस्टर्ड नं. एमएच/बाय-साऊथ/२०

असा. क्र. ७१

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

बुधवार, नोव्हेंबर ६, १९९६/कार्तिक १५, शके १९१८

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत

## भाग एक-अ—मध्य उप-विभाग

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना याव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

क्रमांक एसईसी/जीईएन-१०९६/सीआर-१७/का-३.
नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२.
दिनांक ५ नोव्हेंबर १९९६.

प्रति

(१) आयुक्त
महानगरपालिका (सर्व)

(२) जिल्हाधिकारी (सर्व)
(मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा वगळून).

**विषय.**—महानगरपालिका व नगरपरिषदांच्या निवडणुका.
मतदार यादीबाबत.

महानगरपालिका व नगरपरिषदांसाठी लागू असलेल्या खालील कायद्यातील तरतुदीप्रमाणे महानगरपालिका व नगरपरिषदांच्या निवडणुकीसाठी राज्य निवडणूक आयुक्त जी तारीख अधिसूचित करतील त्या तारखेस अस्तित्वात असलेली विधानसभा मतदार यादी महानगरपालिका/नगरपरिषदांच्या प्रभागामध्ये विभागून व छापून अधिप्रमाणित करून वापरावयाची आहे :—

(१) मुंबई महानगरपालिका अधिनियम (सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३).

(२) नागपूर महानगरपालिका अधिनियम, १९४८ (सन १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २).

(३) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९).

(४) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, (१९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०).

२. वरील तरतुदीप्रमाणे मतदार यादी तयार करीत असताना विधानसभेच्या मतदार यादीप्रमाणे मतदारांची नावे ज्या नगरपरिषद निवडणूक प्रभागामध्ये समाविष्ट असणे आवश्यक आहे, त्याऐवजी काही नगरपरिषदांच्या संदर्भात त्या मतदारांची नावे नगरपरिषदेच्या दुसऱ्याच प्रभागामध्ये समाविष्ट होऊन छापली गेल्याचे तसेच नगरपरिषद क्षेत्रासाठी राज्य निवडणूक आयुक्तांनी अधिसूचित केलेल्या तारखेस अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीत नाव आहे, परंतु नगरपरिषद निवडणुकीसाठी

प्रभागनिहाय मतदार यादी तयार करून छापताना नगरपरिषदेतील कोणत्याही निवडणूक प्रभागामध्ये नाव समाविष्ट करून छापण्याचे राहून गेल्याचे राज्य निवडणूक आयोगाच्या निदर्शनास आणण्यात आले आहे. वरील वस्तुस्थितीचा विचार करून या संदर्भात राज्य निवडणूक आयुक्तांचे मला आपणास खालीलप्रमाणे कळविण्याचे आदेश आहेत :—

(१) विधानसभा मतदार यादीवरून महानगरपालिका व नगरपरिषदांच्या निवडणुकीसाठी यांत्रिकतेप्रमाणे (Mechanically) प्रभागामध्ये विभागून छापून घेताना काही त्रुटी निर्माण झाल्यास त्या दुरुस्त करण्याची संबंधित कायद्यामध्ये तरतूद करण्यात आलेली नाही. परंतु, विधानसभा मतदार यादीमध्ये नाव समाविष्ट असलेल्या मतदारास मतदार यादी तयार करणाऱ्या व ती अधिप्रमाणित करणाच्या अधिकाऱ्याच्या निष्काळजीपणामुळे झालेल्या चुकांमुळे संबंधित प्रभागामध्ये मतदान करण्यापासून वंचित करणे योग्य होणार नसल्याकारणाने भारतीय संविधानाच्या कलम २४३-झेडए व मुंबई महानगरपालिका अधिनियम (सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३) चे कलम १८-अ (४) व कलम १९ (१) (वी), नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ (सन १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २) चे कलम ९-बी व कलम १२, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९) चे कलम १४(४) व कलम ७-अ व महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०) चे कलम १०-अ (४) व कलम ११ खालील व इतर प्राप्त अधिकारांचा वापर करून राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र असे आदेश देत आहेत की, महानगरपालिका व नगरपरिषदांच्या निवडणुकीसाठी वर नमूद केलेल्या संबंधित कायद्यातील तरतुदीप्रमाणे राज्य निवडणूक आयुक्तांनी अधिसूचित केलेल्या तारखेस अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीवरून महानगरपालिका व नगरपरिषदांच्या निवडणुकीसाठी मतदार यादी तयार करून छापून घेतल्यानंतर विधानसभेच्या मतदार यादीप्रमाणे एखाद्या मतदाराचे नाव अगर मतदारांची नावे विधानसभा मतदार यादीचा विचार करताना महानगरपालिका व नगरपरिषदांच्या ज्या प्रभागामध्ये नाव/नावे समाविष्ट असणे आवश्यक आहे, त्याऐवजी दुसऱ्याच प्रभागामध्ये नाव/नावे समाविष्ट झाली असल्याचे निदर्शनास आल्यास कायद्यातील वर नमूद केलेल्या तरतुदीप्रमाणे मतदार यादी अधिप्रमाणात करण्यासाठी सक्षम केलेल्या अधिकाऱ्याने अशा नावांची यादी करून, त्या खाली तारखेसह सही करून ती यादी संबंधित प्रभागाच्या मतदार यादीसोबत जोडावी.

(२) तसेच विधानसभा मतदार यादीत नाव आहे, परंतु महानगरपालिका/नगरपरिषदांच्या प्रभागनिहाय तयार केलेल्या कोणत्याही प्रभागाच्या मतदार यादीमध्ये नाव समाविष्ट नसल्याचे निदर्शनास आल्यास कायद्यातील वर नमूद केलेल्या तरतुदीप्रमाणे मतदार यादी अधिप्रमाणित करण्यास सक्षम केलेल्या अधिकाऱ्यांनी अशा नावांची यादी करून त्याखाली तारखेसह सही करून ती यादी संबंधित प्रभागाच्या मतदार यादीसोबत जोडावी.

(३) वरीलप्रमाणे तयार केलेल्या यादीतील मतदारास/मतदारांना संबंधित प्रभागाच्या निवडणुकीसाठी मतदार करण्यास परवानगी देण्यात यावी.

(४) त्या संदर्भात आवश्यक त्या सूचना निर्वाचन अधिकारी व केंद्राध्यक्ष यांना द्याव्यात.

(५) तसेच अनुक्रमांक १ प्रमाणे तयार केलेल्या यादीची एक प्रत ज्या प्रभागाच्या मतदार यादीमध्ये चुकीने नाव/नावे समाविष्ट झाली असतील त्या प्रभागाच्या मतदान केंद्राध्यक्षाकडे देऊन बोगस मतदान होणार नाही अशी दक्षता घेण्याबाबत त्यांना सूचना द्याव्यात.

निवडणुका स्वच्छ, निर्भय व खुल्या वातावरणात होण्याच्या दृष्टीने भारताच्या संविधानात सुधारणा करून राज्य निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी निवडणुका घेण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाचा स्वतंत्र अधिकारी/कर्मचारीवर्ग निर्माण केलेला नसल्यामुळे राज्य निवडणूक आयोगास जिल्ह्यातील सरकारी व स्थानिक स्वराज्य संस्थांमधील अधिकारी व कर्मचारी यांच्याकडूनन निवडणुकांचे काम करून घ्यावयाचे आहे व त्यासाठी कायद्यातील तरतुदींनुसार असे अधिकारी/कर्मचारी हे राज्य निवडणूक आयोगाच्या पर्यवेक्षण, निर्देशन व नियंत्रण याखाली निवडणुकीची कामे करीत असतात. निवडणुकांसाठी प्रभाग रचना करणे, मतदार याद्या तयार करणे व प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रिया पूर्ण करणे ह्या सर्व बाबी अत्यंत जबाबदारीच्या असून, त्याकामी कोणत्याही प्रकारचा निष्काळजीपणा करणे ही बाब अत्यंत गंभीर असून अक्षम्य आहे. त्यामुळे, राज्य निवडणूक आयुक्तांचे असेही आदेश आहेत की, जेथे अशा प्रकारच्या चुका झाल्याचे दिसून येईल त्या प्रकरणात संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेविरुद्ध विभागीय चौकशी त्वरित सुरू करावी व त्याचा प्राथमिक अहवालही राज्य निवडणूक आयोगास त्वरित पाठवावा.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,
**बा. र. पोखरकर,**
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.